RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ९, अंक ७] सोमवार, जानेवारी २३, २०२३/ माघ ३, शके १९४४ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक १२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

**सन २०२३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११.—** महाराष्ट्र पोलीस अधिनियम आणि महाराष्ट्र सिनेमा (विनियमन) अधिनियम यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. — **पृष्ठे** १-२

दिनांक २० जानेवारी २०२३ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**मुग्धा अ. सावंत,**
प्रारुपकार-नि-सह सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

**सन २०२३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११.**

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात** दिनांक २३ जानेवारी २०२३ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र पोलीस अधिनियम आणि महाराष्ट्र सिनेमा (विनियमन) अधिनियम यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

१९५१ चा २२. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र पोलीस अधिनियम आणि महाराष्ट्र सिनेमा (विनियमन)
१९५३ चा ११. अधिनियम यांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या त्र्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे:—

प्रकरण एक

**प्रारंभिक**

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र पोलीस आणि महाराष्ट्र सिनेमा (विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २०२२, संक्षिप्त नाव.
असे म्हणावे.

प्रकरण दोन

## महाराष्ट्र पोलीस अधिनियम याची सुधारणा.

सन १९५१ चा अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ९०अ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र पोलीस अधिनियम ( यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश, "पोलीस अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ९०अ मध्ये, पोट-कलम (१) मधील, खंड (१) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईलः— १९५१ चा २२.

"(१) पहिल्या अपराधाबद्दल, जी तीन हजार रूपयांपर्यंत असू शकेल इतकी दंडाची शिक्षा होईल;".

सन १९५१ चा अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ११८ ची सुधारणा.

**३.** पोलीस अधिनियमाच्या कलम ११८ मध्ये, पोट-कलम (१) मधील, खंड (एक) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईलः—

"(एक) पहिल्या अपराधाबद्दल, जी चार हजार रूपयांपर्यंत असू शकेल इतकी दंडाची शिक्षा होईल;".

सन १९५१ चा अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम १३१ ची सुधारणा.

**४.** पोलीस अधिनियमाच्या कलम १३१ मध्ये, खंड (ब) मधील, उप-खंड (दोन) वगळण्यात येईल.

प्रकरण तीन

## महाराष्ट्र सिनेमा (विनियमन) अधिनियम याची सुधारणा.

सन १९५३ चा अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ७ ची सुधारणा.

**५.** महाराष्ट्र सिनेमा (विनियमन) अधिनियम (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश, "सिनेमा अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ७ मध्ये, पोट-कलम (१) मधील, "त्यांना तीन महिन्यांपर्यंत वाढविता येईल" या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि "इतकी दंडाची शिक्षा होईल," या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईलः— १९५३ चा ११.

"त्यांना, पन्नास हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाची शिक्षा होईल आणि अपराध करण्याचे चालू राहिल्यास त्याबाबतीत, अशा पहिल्या अपराधाच्या दोषसिद्धीनंतर, ज्या कालावधीत असा अपराध करण्याचे चालू राहिले असेल त्या कालावधीतील प्रत्येक दिवसासाठी, पाच हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतकी आणखी दंडाची शिक्षा होईल,".

सन १९५३ चा अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ९ ची सुधारणा.

**६.** सिनेमा अधिनियमाच्या कलम ९ मध्ये, पोट-कलम (३) मधील, "तीन महिनेपर्यंत असू शकेल" या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि "आणखी दंडाची शिक्षा होईल," या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईलः—

"पन्नास हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाची शिक्षा होईल आणि अपराध करण्याचे चालू राहिल्यास त्याबाबतीत, अशा पहिल्या अपराधाच्या दोषसिद्धीनंतर, ज्या कालावधीत असा अपराध करण्याचे चालू राहिले असेल त्या कालावधीतील प्रत्येक दिवसासाठी, पाच हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या आणखी दंडाची शिक्षा होईल,".

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.